MHAH230001472017

**विशेष दिवाणी दावा क्र. ८/२०१७ मधील नि.४९ वरील आदेश**

**(अमोल साबळे वि.सिंधुबाई बबन व इतर)**

**१.** अर्ज व म्हणणे पाहिले. उभय पक्षांचे सुविदय वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

**२.** वादीचे वारसांनी अर्जात कथन केले आहे की, वादी दि. १४/०७/२०२४ रोजी रुबी हॉल क्लिनिक, पुणे येथे मयत झाले. वादीचे कायदेशीर वारस त्वरीत दावा सरनाम्यात घेतले गेले नाहीत. मुदतीत वारस दावा सरनाम्यात न घेतल्याने त्यांच्याविरुध्द दावा अबेट झाला आहे. तरी प्रस्तुत दाव्याचा गुणदोषावर निकाल होण्यासाठी वादी विरुध्द झालेला अबेट आदेश रद्द होणे गरजेचे आहे.

**३.** प्रतिवादी यांनी त्याच अर्जावर म्हणणे देवुन अर्ज मंजुर होण्यास हरकत घेतली आहे. प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार, वादीचा अर्ज खरा, बरोबर व कायदेशीर नाही. वादीचे वारसांना वादी मयत असल्याची माहिती असून देखील त्यांचे वारस मुदतीत रेकॉर्डवर घेण्यास जाणिवपुर्वक विलंब केलेला आहे. अर्जातील कारण योग्य व संयुक्तिक नाही. तरी अर्ज रद्द करावा. अर्ज मंजुर करावयाचा झाल्यास २५००/– रुपये कॉस्ट करण्यात यावी.

**४.** अभिलेख पडताळला. वर्णनयादी निशाणी ५६ लगत असलेले मृत्युप्रमाणपत्राचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, वादी अमोल रंगनाथ साबळे हे दि. १४/०७/२०२४ रोजी पुणे येथे मयत झाले आहेत. सदर मृत्युप्रमाणपत्र दि.२०/०८/२०२४ रोजी प्राप्त झाले आहे व प्रस्तुत अर्ज दि.२०/०१/२०२५ रोजी दाखल करण्यात आला आहे.

प्रस्तुतचा दावा हा खरेदीखत रद्द करुन मिळण्याकरीता व निरंतर ताकीदीचे मनाई हुकुमाकरीता दाखल केला आहे. त्यामुळे वादीचे वारस दाव्यात आवश्यक पक्षकार आहेत. सर्व आवश्यक पक्षकारांचे दरम्यान वादप्रश्नाचे निरसन एकाचवेळी होणे आवश्यक असल्याने वादी विरुध्द झालेला अबेट आदेश रद्द करणे न्यायोचित ठरणार आहे. करीता, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आ दे श**

१. अर्ज नि. ४९ प्रतिवादींना रक्कम रु.३००/–कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. सदर आदेशाची पुर्तता झाल्यानंतर मयत वादी विरुध्द झालेला अबेट आदेश रद्द करण्यात येईल.

SHIVAJI PANDHRINATH KEKAN

Digitally signed by SHIVAJI PANDHRINATH KEKAN
Date: 2025.01.20 13:29:16 +0530

श्रीगोंदा. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
दिनांक २०/०१/२०२५. श्रीगोंदा, जि. अहमदनगर.